क्र.कार्या-१२/जिपपंस/आरआर/१-८५/१७
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दिनांक: - १०/०१/२०१७

प्रति,

**जिल्हा सुचना व विज्ञान केंद्र (NIC),**
**जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर .**

विषय:-जिल्हा परिषद व पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणूक २०१७
मतदारांकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचना.

संदर्भ:- मा.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक-रानिआ/
मनपा-२०१७/प्र.क्र.१७/का.५, दिनांक ०८/०२/२०१७.

कोल्हापूर जिल्हयातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक सन २०१७ साठीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. सदर कार्यक्रम अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयात दिनांक २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मतदान होणार आहे. उपरोक्त संदर्भीय विषयांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने मा.राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त मतदारांना द्यावयाच्या सूचनांचा नमुना सोबत जोडून पाठविण्यात आलेला आहे. सदरच्या नमुन्यास मतदानाच्या तारखेपूर्वी जनतेच्या माहितीसाठी त्यांस आपल्या संकेतस्थळावर विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी. त्याबाबतचा देखील प्रसिद्धी अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

**सोबत:- मा.राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र व नमुना जोडलेला आहे.**

(डॉ.अमित सैनी)
जिल्हाधिकारी कोल्हापूर

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.१७/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२

दिनांक:- ०८/०२/२०१७

प्रति,

आयुक्त, महानगरपालिका,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, भंडारा, गोंदिया व नागपूर),

विषय :- महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका मतदारांकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचना...

महोदय/महोदया,

महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता यथास्थिती दि.१६ फेब्रुवारी व २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मतदान होणार आहे. निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने मतदारांना द्यावयाच्या सूचनांचा नमुना सोबत जोडला आहे. मतदानाच्या तारखेपूर्वी सदर नमुन्याला वर्तमानपत्रात जाहिरातीच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी द्यावी व त्याचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

सोबत :- जाहिरातीचा नमुना.

D:\MNC\Election March-April २०१७.docx.RSK

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## महानगरपालिका,जिल्हा परिषद/पंचायत समिती
## सार्वत्रिक निवडणुका (मतदान दिनांक १६ व २१ फेब्रुवारी, २०१७)

# मतदारांसाठी सूचना

### निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने नवीन उपाययोजना

(१) प्रत्येक उमेदवाराने खर्चाची मर्यादा ओलांडल्यास किंवा निवडणूक संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत खर्चाचा एकूण बिनचूक हिशोब सादर केला नाही तर अनर्हतेची कार्यवाही.

(२) प्रत्येक राजकीय पक्षाने निवडणूक संपल्यानंतर ६०दिवसांच्या आत खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक, नाहीतर नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही.

(३) उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्राचा गोषवारा मतदान केंद्रासमोर प्रकाशित करण्यात येईल.

(४) मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी गृहनिर्माण संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये, बँका, स्वयंसेवी संस्था, उद्योग समूह, इत्यादींची मदत व सोशल मीडियाचा मोठया प्रमाणावर वापर.

(५) मतदारांना प्रलोभने देण्यासाठी वाटण्यात येणाऱ्या रकमा, दारु व इतर वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना.

(६) आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त जबाबदार व त्यांच्या स्तरावर विशेष कक्ष.

(७) दिव्यांग व वृध्द मतदारांसाठी व्यवस्था.

## सर्व मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे.

भारत निवडणूक आयोगाने दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी प्रसिध्द केलेली मतदार यादी वापरण्यात येईल.